17/05/2022 सार्वभौम जनता

# जबरी चोरीतील तीन आरोपींना अटक

## २ लाख ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त, स्थागुशाची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)** - ऑटोरिक्षातील प्रवाशावर खुनी हल्ला करून चोरट्यांनी जबरी चोरी केल्याची घटना विमानतळ पोलीस ठाणे हद्दीत घडली होती. यातील तीन आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले असून २ लाख ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. १३ मे रोजी संध्याकाळी ९ वाजताच्या सुमारास पोलीस ठाणे विमानतळ हद्दीत ऑटोतील प्रवाशाना दोन अज्ञात इसमांनी खुनाचा प्रयत्न करून जबरी चोरी केली होती. नमुद प्रकरणात ऑटोचालकाच्या फिर्यादीवरून विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता. सदर गुन्ह्यातील अज्ञात आरोपीतांना अटक करण्याबाबत श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधिक्षक यांनी पोलीस निरीक्षक स्थागुशा नांदेड यांना आदेशित केले होते. त्यानुसार स्थागुशाचे पोलीस निरीक्षक यांनी वेगवेगळी पथके तयार करून आरोपींचा शोध सुरू केला.

दि. १६ मे रोजी स्थागुशाच्या पथकास गुप्त माहिती मिळाली की, सदर गुन्ह्यातील फिर्यादी शेरू खुशालसिंह परमार व त्याचे दोन साथीदारांनी मिळून केला असून परमार हा महाराणा प्रतापचौकात थांबलेला आहे. वगैरे माहिती मिळाल्याने त्यांनी तशी माहिती वरिष्ठांना देवून स्थागुशाच्या पथकाने महाराणा प्रताप चौक नांदेड येथे जावून सापळा रच्न आरोपी शेरू खुशालसिंह परमार (४२) व्यवसाय ऑटोचालक रा. सखोजीनगर, नांदेड यास ताब्यात घेवून त्यास गुन्ह्याबाबत विचारपूस केली. सदरचा गुन्हा त्याने व त्याचे दोन साथीदार सतीष उर्फ सत्या हनुमंत चव्हाण रा. बालाजीनगर, कृष्णा चौक नांदेड व आकाश उर्फ रितीफ प्रकाश खिल्लारे रा. तानाजीनगर नांदेड यांनी मिळून केला असल्याचे सांगितले. या तीनही आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेला एक ऑटो व **(पान ४ वर...)**